# येत्या १० दिवसांत दुसरी मेट्रो मुंबईत दाखल होणार

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेच्या चाचणीला सुरुवात झाली असून आतापर्यंत केवळ १ प्रोटोटाईप ट्रेन दाखल झाली आहे. येत्या १० दिवसांत मेट्रो ३ साठी दुसरी ट्रेन मुंबईत दाखल होणार आहे. आंध्र प्रदेशच्या श्रीसिटी येथून १४०० किमी अंतर कापल्यानंतर हे रेक मुंबईतील आरेतील सारीपूत नगर येथे दाखल होणार आहे.

श्रीसिटीमधून जुलैत पहिली प्रोटोटाईप ट्रेन दाखल झाली होती. त्यानंतर दुसरी ट्रेन नव्या वर्षात दाखल होणार आहे. ती दाखल झाल्यानंतर आधीच्या मेट्रो डब्यांसह ताफ्यात जोडली जाणार आहे. या प्रक्रियेला १५ ते २० दिवस लागणार आहेत. सारीपूत नगर आणि मरोळ नाका स्थानकांदरम्यान सध्या मेट्रोची चाचणी सुरू करण्यात आली आहे. या दुसऱ्या ट्रेनमुळे नव्या क्रॉसओव्हर ट्रॅकची अचूकता तपासण्यात येणार आहे. तसेच एकाच वेळेस दोन्ही ट्रॅकवर ट्रेन चालवण्याची चाचणी घेण्यात येणार आहे. जर क्रॉसओव्हर ट्रॅकचे काम पूर्ण झाले तर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून सहार मेट्रो स्थानकापर्यंत चाचणी सुरू करण्यात येणार आहे.